# शंभू गणपुले

# ‘अबक’



# ‘अबक’

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# ‘अबक’

(स्वतंत्र नाटक)


## लेखक - शंभू गणपुले



ई साहित्य प्रतिष्ठान

लेखक : शंभू गणपुले

" योगिनी", गणेश कॉलनी, मु. पेठ वडगांव, जिल्हा कोल्हापूर

संपर्क   :जयंत करंदीकर

--- 3, Srirang, Gandhibhavan road, Kothrud,

Pune 411038   020-25384472, 9822439492

jayant. karandikar@gmail. com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व कायदेशीर हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957.  Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane. 400604.

www. esahity. com

esahity@gmail.com

Whatsapp: 7710980841

APP : https://play.
google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks

**प्रकाशन** : २०१८

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य- प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे.

लेखक: श्री. महादेव परशुराम उर्फ शंभू गणपुले



वय : आठ्‌ठ्याहत्तर

शिक्षण: बी. ए. , एल. एल. बी. , हिंदी विशारद

व्यवसाय: सेवानिवृत्त अधिकारी, नाबार्ड, सध्या लेखन,

प्रकाशित लेखन: "ताओ उपनिषद" ,

कथा-कविता संग्रह -२,

अंतरंग,

एक मोकाट वारं,

किती तुज समजावू सांग, असं पण होऊ शकतं

विशेष रुची: आतापर्यंत वेगवेगळ्या संस्थामधून १० नाटके बसविली. त्यात कामही केले. २ दूरदर्शन मालीकांचे ( साळसूद, घरकूल) लेखन, एका मालिकेत काम,

निवास: "योगिनी ", गणेश कॉलनी, मु. पेठ वडगांव, जिल्हा कोल्हापूर

©सर्व हक्क श्री. जयंत करंदिकर यांचे स्वाधीन.

जयंत करंदीकर

--- 3, Srirang, Gandhibhavan road, Kothrud,

Pune 411038 020-25384472, 9822439492




शंभू गणपुले


यांची

ई साहित्य

प्रतिष्ठानतर्फ़े


प्रकाशित


झालेली पुस्तके










# अर्पण पत्रिका

’ज्यानी माझ्यामधे लेख़नाची उर्मी निर्माण केली आणि माझ्याकडून काही लेखन करून घेतले ते माझे आजोबा   -माझ्या आईचे वडील- विद्यावाचस्पती श्री कृष्णाजी केशव कोल्हटकर, यांच्या स्मृतीस माझे सर्व लेखन मी समर्पित करत आहे.

-- शंभू गणपुले

# ‘अबक’

**लेखक - शंभू गणपुले**

## पात्रे - दोन पुरुष आणि दोन स्त्रिया

| | | |
|---|---|---|
| अबक | - | पहिले पुरुष पात्र |
| सौ.अबक | - | पहिले स्त्री पात्र. |
| पंडीत, बाळासाहेब , | } - | दुसरे पुरुष पात्र. |
| साहेब (बॉस), सासरा | - | |
| बेबी, उषा | - | दुसरे स्त्री पात्र. |

# अबक

(मध्यम वयाचा एक माणूस प्रवेश करतो. रंगमंचाच्या मध्यावर येऊन उभा रहातो. सगळीकडे एक नजर टाकतो. नंतर बोलू लागतो.)

अबक - नमस्कार मंडळी! माझं नांव अशोक बलवंत करमरकर. कुणी मला अशक्या म्हणतं. कुणी 'अबे ओऽबल्लूकी औलाद' अशी हाक मारतं. कुणी ओय् जे कोर्मकार अशी हाक मारून मला महाराष्ट्रातून बंगालमधे पकून देतात. शाळकरी मुलांनी माझ्या नावाचं इंग्रजीकरण केलय्. ती मुलं मला डूडायडू मामा म्हणतात!

खरंतर किती सरळ आडनाव आहे माझं! क.र.म.र.क.र काना नाही, मात्रा नाही, वेलांटी नाही, रफार नाही, जोडाक्षर सुद्धा नाही! आगगाडीच्या डब्यासारखी एकामागं एक जोडलेली शुद्ध सरळ अक्षरं. माझ्या नावाची आद्याक्षरं घेतली तरी साधं, सरळ नाव तयार होतं- अबक! तर असा मी अबक.

वडिलांनी मोठ्या विश्वासानं माझं नांव अशोक ठेवलं असावं. त्यांना वाटलं असेल की मी सम्राट अशोकासारखा चक्रवर्ती होईन आणि एक दिवस राष्ट्रध्वजावर नाही तर नाही, पण एकाद्या पक्षाच्या झेंड्यावर तरी अशोक चक्र झळकेल! पण तसं काही झालं नाही. नाव ठेवल्या दिवसापासूनच मी अबक झालो, सामान्य माणूस! इंग्रजीत म्हणतात ना 'आहे तो कुणी तरी एक्स वाय् झेड!' तसा मी मराठीतला अबक. अबकची विशेष माहिती सांगताच येणार नाही. पुलदे म्हटलं की महाराष्ट्राच्या दोन पिढ्यांना खळखळून हसवणांच्या पु.ल. देशपांड्याचा हसरा चेहरा डोळ्यांसमोर उभा राहतो. न. चिं. म्हटलं की मराठी भाषेच्या माधुर्याला लवंगी मिरचीचा साज चढवणारे नरसिंह चिंतामण केळकरच असले पाहिजेत अशी खात्री पटते. पण अबक म्हटल्यावर?

डोळ्यापुढे कुणीच उभं रहात नाही. अबक हा कुणीच नसतो. भूमितीच्या आकृतीला अबक असं नांव दिलं तर तो त्रिकोण आहे एवढं तरी समजतं. पण नुसतंच अबक म्हटलं तर? तर अर्थ एकच! एक सामान्य माणूस. जगण्यासाठो मरणारा आणि मरत मरत जगणारा!

तर मंडळी मी अबक. तुम्हाला बघितल्यावर वाटलं तुमच्याशी चार सुखदुःखाच्या गप्पा माराव्यात! मोठ्या लोकांची सुख-दुःखं मोठी असतात. मी तळागाळातला सामान्य माणूस. माझ्या नांवावर जाऊ नका. गाळात गेलेला एकादा करमरकर सापडतोच! तर माझी सुख-दुःखं ती काय असणार? पण लहान असोत किंवा मोठी असोत. सुखंही सुखंच आणि दुःखंही दुःखंच असतात!

आज सगळीकडं तळागाळातल्या माणसाला वर काढण्यासाठी घोषणांचा गदारोळ चालू आहे. पण गंमतीची गोष्ट अशी की माझ्यापर्यंत अजून कुणीच पोहोचलेलं नाही. मग मीच ठरवलं की सुख दुःखाच्या कोंडमाऱ्यातून आपणच बाहेर पडावं! बाहेर पडून काय करावं याचा विचार करत करत मी गणंजय सोसायटीजवळच्या नाल्याजवळ येऊन थांबलो. नाल्यावरचा पूल तो! माझ्यासारख्या माणसाच्या नशिबी हल्ली नदीचा काठ, काठावरची वनराई, भुंग्याचं संगीत, वाऱ्याच्या झुळकी बरोबर येणारा रानफ़ुलांचा मस्त सुगंध असलं काही नसतंच! आमच्या नशिबी असतं गटारांचं तुंबलेलं पाणी, बेडकांची डरॉव्-डरॉव् आणि कुजलेल्या कचऱ्याचा, नाकातले केस जाळून टाकणारा, कुबट वास, पण करतो काय? पाय थकले होते. तसाच उभा राहिलो थोडावेळ. तेवढ्यात पंडीतकाका घाईघाईनं गांधी भवनकडं चाललेले दिसले.

*(पंडित, वय ४०-४५, एक प्रचंड उत्साही माणूस. प्रवेश करतो. अबकला बघून थबकतो. जवळ येतो.)*

पंडीत - अरे अबक? इथं काय करतोयस्? माझ्याबरोबर चल!

अबक - पण कुठं?

पंडीत - आजच्या पेपरमधली जाहिरात बघितली नाहीस?

अबक - कसली जाहिरात?

पंडीत - भले ऽऽ! अरे आज गांधी भवन हॉलमधे कोथरूडमधल्या मुलांसाठी विविध कलागुण दर्शनाच्या स्पर्धा आहेत. वहिनींनी निरोप सांगितला नाही? आजच्या स्पर्धेसाठी तीन पैकी एक परिक्षक तू आहेस!

अबक - पंडीत , तुला माहीत आहे, परिक्षक म्हणून मी कुठंही जात नाही!

पंडीत - अरे पण तुला नाटक आणि संगिताची चांगली जाण आहे आणि छोट्या छोट्या मुलांच्या तर स्पर्धा आहेत!

अबक - म्हणूनच भिती वाटते. माझ्याकडून एकाद्यावर अन्याय झाला तर?

पंडीत - ठीक आहे. कार्यक्रम नुसते बघायला तर चल!

आम्ही दोघं गांधीभवनमधे पोहोचलो. स्टेज कसं सजवलंय् ते पहावं म्हणून स्टेजवर आलो तर एका मुलानं मला आतून स्टेजवर ढकललं आणि सांगितलं. ‘तुम्हाला काय बोलायचंय् ते प्रेक्षकांना सांगा. त्या बिचाऱ्या मुलांना बिचकवू नका! मुलं तयार होतायत् म्हणून ती यक्ती योजली असावी! पहिलं तुम्ही ऐकलंच आहात. आता माझ्या आयुष्यातल्या काही झलकी नाट्यरूपात मी सादर करू कां? तसच करतो. माझ्या या

नाटकांत फक्त चार पात्रं आहेत. दोन पुरूष पात्रं आणि दोन स्त्री पात्रं. मला आणि पंडीतला पाहिलंच आहात! माझ्या आयुष्यात आलेली इतर पात्रं बघाल हळूंहळूं!

माझं मूळ घराणं कोकणातलं! कोकणच्या मातीनं अनेक थोर पुरूषांना जन्म दिलाय. सावरकर, टिळक, जयवंत दळवी, मधू दंडवते ही सगळी मंडळी कोकणातच जन्माला आली होती. लहानपणी माझी अशी श्रद्धा होती की जन्म द्यावा तर तो कोकणच्या मातीनं. त्यामुळं भगतसिंग, चंद्रशेखर आझाद, सुभाषचंद्र बोस ही मंडळी कोकणात कशी जन्माला आली नाहीत याचं मला आश्चर्य वाटायचं! पण काही वर्षापूर्वी एका बैलानं सिमेंटच्या पोत्यात शिंगं खुपसून साऱ्या महाराष्ट्रात जो राडा केला होता ते बघितल्यावर वाटलं कोकणची माती बाटली कार? मंडळी माणसाला एकवेळ पक्ष बदलता येईल, नाती बदलता येतील, पण जन्म देणारी माती नाही बदलता येणार!! तर ... माझा जन्मही त्याच मातीतला. इकडे माझा जन्म झाला आणि तिकडे दुसरं महायुद्ध सुरूं झालं. त्या युद्धाच्या ठिणग्या जगभर पसरल्या. मातीच्या छोट्या, छोट्या तुकड्यासाठी गृहयुद्धं सुरू झाली. आपल्या वाट्याला आलेल्या मातीच्या तुकड्यातून चार जणांची पोटं भरता येणार नाहीत हे लक्षात आल्यावर बळवंतरावांनी कोकण सोडलं आणि देशावर येऊन एका वकिलाकडं कारकुनी पत्करली! वडिलोपार्जित कारकुनीनं माझाही पिच्छा सोडलेला नाही!

एका शास्त्रज्ञानं म्हटलंय् की काही झाडं उंच असतात म्हणून लांब मानेचे उंट आणि जिराप जन्माला येतात. उलट कांही झुडपं खुरटी असतात म्हणून जमिनीवर सरपटणारे प्राणी जन्माला येतात. याच न्यायानं उंची न गाठणाऱ्या माणसांना त्यांच्याच

उंचीच्या नोकऱ्या मिळतात!! अशी एकादी नोकरी पत्करायची. लग्न करून संसाराला लागायचं! बस्!!

(मुक्त छंदात गातो)
एक दोन, एक दोन - बायको, मूल, बाजार, त्रिकोण!
तीन चार, तीन चार - नाटक, गाण्याची हौसच फार!
पांच सहा, पाच सहा - शिकवणीची फजिती पहा.
सात आठ, सात आठ - प्रेयसोनं फिरवली पाठ.
नऊ दहा, नऊ दहा - कारकुनाचा संसार पहा.(स्वतःशीच हसतो.)

बायको - (आतून) अहो ऽऽऽ ऐकलत कां?

अबक - हा माझ्या बायकोचा आवाज. सारखी अशा वरच्या पट्टीत ओरडत असते. पण पट्ट्या वेगळ्या असल्या तरी संसाराच्या मैफलीत बायकोला साथीला बसवावंच लागतं!

*(अबक आत जाऊ लागतो. त्याचवेळी त्याची बायको कणकीनं माखलेल्या हातानं प्रवेश करते.)*

अबक - (दचकून) काय म्हणतीयस्?

बायको - बाळ्या केव्हाचा रडतोय्. ऐकू आलं नाही का? का कानात बोळे घालून बसला आहात? त्याला खांद्यावर घेऊन थोपटा जरा! (बायको जाते. अबक स्वतःचे काम तपासतो. 'नाही' अशी मान हलवून विरूद्ध बाजूला आत जातो. क्षणभरानं मुलाला खांद्यावर घेऊन थोपटल्याचा अभिनय करत बाहेर येतो.)

अबक - उगीऽउगी. अंगाई ऽऽऽ! ......मी गाणं म्हणू कां?

झेंडा ऊँचा रहे हमारा, विजयी विश्व तिरंगा प्यारा (२)

(बायको तरातरा प्रवेश करते.)

बायको - जळ्ळलं मेलं लक्षण ते.

अबक - आता काय झालं?

बायको - काय चालवलयत् हे?

अबक - तूच म्हणालीस ना बाळ्याला खांद्यावर घेऊन थोपटून झोपवा. तेच करतोय्!

बायको - झेंडा वंदनाचं गाणं म्हणायला सांगितलं होतं मी? असल्या गाण्यानं तो जन्मात झोपायचा नाही.

अबक - अगं लहान मुलांना गाण्यातलं काय कळतंय्! त्यांना कळतो तो सूर!

बायको - कळलंऽ! चार लोकांनी तुमच्या गाण्याचं कौतुक केलं म्हणून हुरळून जाऊ नका!! बाळ्या झोपेल असं गाणं म्हणा.

(बायको फणकाऱ्यानं आत निघून जाते.)

अबक - मंडळी, म्हणजे संगीत शिकलो मी! आणि आता ही मला शिकवतीय गाणं कसं म्हणायचं ते!

(बाळ्याला थोपटत वेगळं गाणं म्हणू लागतो.)

अबक - ये गंऽ तू गंऽऽ गाई ऽऽऽ! वासराचे आईऽऽऽ तान्ह्या बाळाला दूधऽऽ देई । गडूभऽऽरऽऽ । अंगडं टोपडंऽऽऽ (बाळ्याकडं बघून) मंडळी, बाळ्या झोपला बहुतेक. मी त्याला आत ठेऊन येतो.

(क्षणभर आंत जातो. बाहेर येतो.)

अबक - ही माझ्या संसाराची पहिली झलक!

(त्याचवेळी बायको प्रवेश करते)

बायको - काय हो?

अबक - कुठं काय?

बायको - बाळ्या झोपला ना?

अबक - होऽऽऽ!

बायको - मग आता स्वतःशीच काय बडबडताय्? मुकाट्यानं बाजारात जा आणि दोन तीन भाज्या आणून टाका.

अबक - अगं,...... पण आज बुधवार! मला बेबीच्या शिकवणीला जायचंय!

बायको - बेबीच्या शिकवणीचं बरं लक्षात राहतं. कारण तिकडं तुमची लाडाची, प्रेमाची प्रेयसी ..... जळलं मेलं लक्षण ते! ते काही नाही भाजी आणून द्या. मग जा कुठं जायचंय् ते! घरात काडीचं लक्ष नाही!

अबक - अगं.. पण... ऑफीसला जायला उशीर नाही कां होणार! तिथंही शिव्या खाव्या लागतील!

बायको - म्हणजे काय? मी घरी शिव्या खायला घालते तुम्हाला?

अबक - तसं नव्हतं म्हणायचं मला. तू मला भात, आमटी, पोळी भाजी, सगळं खायला घालतेस. पण ....

बायको - काही बोलू नका! आयुष्याची गांठ पडलीय् ती ही करमरकरांशी! कर, मर, कर! मी मेलीनं दिवसभर मर मर मरायचं आणि नंतर तुमच्या शिव्या खायच्या!

(रडत रडत निघून जाते.)

अबक - मंडळी, नवरा-बायकोच्या भांडणात कोण कुणाला शिव्या खायला घालतं त्याचा निर्णय सुप्रीम कोर्ट सुद्धा करू शकणार नाही. समजा न्यायाधिशांनी चुकून पुरूषांच्या बाजूनं

निकाल दिला तर घरी जाऊन त्यांनाही शिव्याच खाव्या लागतील! (आत डोकावून) झालंऽ! हिनं रडायला सुरवात केली! (समजावणीच्या स्वरात) डार्लिंग, मी काय करतो, शेजारच्या बंड्याला घेऊन जातो आणि त्याच्या बरोबर भाजी पाठवून देतो! म्हणजे बाजार ते घर एवढा हेलपाटा तरी वाचेल!

*(बाहेर जातो. क्षणभरानं घाम पुसत पुसत प्रवेश करतो बेल वाजवतो. आतून 'आलेऽऽ' असा धमकावणीवजा आवाज येतो. पाठोपाठ बायकोचा रोल करणारं पात्रच, एकाद्या अल्लड मुलीसारखी लाजत मुरकत प्रवेश करते. दार उघडल्याचा अभिनय करते. आनंदानं किंचाळते.)*

बेबी - अय्या ऽऽऽ सर तुम्ही ऽऽ?

अबक - हो. आज बुधवार. आपला शिकवणीचा दिवस.

बेबी - हो! पण इतका उशीर झाला म्हणून मला वाटलं तुम्ही येणारच नाही. एक मिनिट थांबा हंऽ! मी दोन खुर्च्या घेऊन येते! (जाते)

अबक - ही माझी शिष्या, बेबी बाळसेदार! सगळं कुटुंब असं बाळसेदार आहे.

(बेबी दोन खुर्च्या घेऊन प्रवेश करते. दोघं बसतात.)

अबक - हंऽ! आपण सुरूवात करू या ना अभ्यासाला? आज कोणता विषय आहे?

बेबी - सामान्य ज्ञान!

अबक - मी वेळोवेळी शिकवलंय ते नीट आठवून, मी विचारतो त्या प्रश्नांची उत्तरं दे. सांग बरं, भारताचे पंतप्रधान कोण आहेत?

बेबी - इंपोर्टेड की लोकल?

अबक - (डोक्यावर हात मारून घेतो) कुणाचंहो नाव सांग.

बेबी - श्रीमती इंदिरा गांधी!

अबक -	अगं त्या तर स्वर्गवासी झाल्या!

बेबी -	वारल्या? (एकदम रडू लागते.)

अबक -	बेबी ऽऽऽ बेबी ऽऽ , अग किती रडशील?

बेबी -	कुणी वारल्याची बातमी कानावर आली तर दुःख होणार नाही का?

अबक -	पण ही बातमी तशी नवी नाही! आता रडून काय उपयोग?.....

बरंऽ, आता दुसरा प्रश्न विचारतो. भारतातला सर्वात मोठा पोलाद कारखाना कुठं आहे आणि तो कुणाच्या सहकार्यानं बांधला आहे?

बेबी -	अंऽऽऽऽ! ....हंऽ! भारतातला सर्वात मोठा पोलाद कारखाना आपल्या गावात आहे आणि माझ्या डॅडींनी तो बँक ऑफ् महाराष्ट्रच्या सहकार्यानं बांधला आहे! इतकी चिक्कू आहे बँक!

अबक -	बेबी, मी तुला काय विचारलं आणि तू काय सांगते आहेस!

बेबी -	आई म्हणाली तेच सांगतीय्. म्हणाली बँकेनं दिलेत किती पैसे तर दहा लाख रूपये. आणि म्हणे पंधरा इंची पाटी लावा 'बँक ऑफ महाराष्ट्रच्या सौजन्याने' .... सर, स्वतःची जाहिरात करून घेणारी माणसं बघितली ना की इतका राग येतो मला की वाटतं त्यांच्या अंगावर भुंकावं! .... सर, मला कुत्र्याचा आवाज कसा काढायचा ते शिकवा ना?

अबक -	अगं ऽऽ पण ....?

बेबी -	अगं नाही अन् बिगं नाही. शिकवा ना!

(अबक कुत्र्याचा आवाज काढून दाखवतो.)

बेबी - आता कोकिळेचा आणि लहान मुलाच्या रडण्याचा आवाज काढून दाखवा. (अबक आढेवेढे घेतो) दाखवा म्हणजे दाखवा! नाही तर मी डॅडींना सांगीन की तुम्हाला काही शिकवता येत नाही. (अबक तसे आवाज काढून दाखवतो.) अय्याऽऽ सर, तुम्ही कित्ती छान रडलात! मला वाटलं.... मला वाटलं... तुम्हाला मांडीवर घेऊन थोपटावं!!

अबक - माझे आई ऽऽऽ! अभ्यास करायचा आहे की नाही? मास्तरनी काही होमवर्क दिलंय का?

बेबी - अय्या ऽऽऽ, मी विसरलीच होती. (आत जाऊन हार्मोनियम घेऊन येते.)

अबक - हेऽ, हेऽ काय?

बेबी - उद्या शाळेत नाट्यसंगीताच्या स्पर्धा आहेत. आई म्हणाली, सरांच्या कडून एकादं नाट्यगीत शिकून घे.

(शिकवणी सुरू होते. बेबीला सूर पकडता येत नाही.)

बेबी - सर तुम्हीच मला प्ले-बॅंक द्या ना!

अबक - प्ले बॅक?... स्पर्धेत? ... पण मुलीला पुरूषाचा प्ले बॅक कसा चालेल?... शिवाय माझा आवाजही ठीक नाहीये!

बेबी - अय्याऽऽ, तुमच्यासाठी आईनं सुंठ घातलेला चहा मगाशीच करून ठेवलाय्. सर, कॉलेजात असतांना तुमचं आणि आईचं लफडं होतं ना, म्हणून आई बाहेर यायला लाजते. पण आज तिला चहा देण्यासाठी बाहेर पाठवतेच.

*(लगबगीनं आत जाते.)*

अबक - ही माझी शिष्या! काय नमुना आहे!! कॉलेजमधल्या आमच्या, म्हणे माझ्या आणि उषाच्या, प्रेमाला चक्क लफडं म्हणाली! तिला असल्या गोष्टीतच जास्त रस आहे.

म्हणूनच गेली दोन वर्षे मी तिला शिकवतोय तरी मी दहाव्वी पास व्हायला तयार नाही! एकदा मी तिच्या वडिलांना समजावण्याचा प्रयत्न केला.

*(पुरूष पात्र एका बाजूनं प्रवेश करून दुसऱ्या बाजूला जाऊ लागतं. अबक त्याला अडवतो.)*

अबक - बाळासाहेब..... थोडं बोलायचं होतं!

बाळासाहेब - बोला!

अबक - म्हणजे म्हणायचं होतं की....

बाळासाहेब - म्हणा नं! फी वाढवून पाहिजे कां? दिली!

अबक - नाही! म्हणायचं होतं की बेबीचं शिक्षणात लक्ष नाही. मग ...

बाळासाहेब - (हसून) हाऽऽ हाऽऽ हाऽऽ! बेबी शिकणार नाही हे मला माहित आहे. पण अशोकराव, खरं सांगू का, बेबीचा मास्तर म्हणून तुम्हाला अपॉईंट केलं त्याच दिवशी माझ्या फाऊंड्रीला पाच लाखाची ऑर्डर मिळाली. तुमचा पायगुण, दुसरं काय. त्याच दिवशी ठरवलं तुमचे पाय या घराला वारंवार लागलेच पाहिजेत. तुमच्या फी वाढीबद्दल उषाशी बोला. मला उशीर होतोय!

*(बाळासाहेब पटकन् निघून जातात.)*

अबक - त्या दिवशी उषाची भेट टाळली मी कशीतरी पण आज.....

*(स्त्री पात्र उषाच्या रूपात प्रवेश करतं. चहाचा कप अबकला देते.*

*अबक उषाची नजर टाळून, एका दमात चहा पिऊन टाकतो. कप उषाकडं देतो. जाऊ लागतो.)*

उषा - चहा खूप गार झालवता कां?

अबक - छे ऽ छेऽ! सगळे चटके सहन करायची सवय झालीय् मला!

उषा - माझ्याशी असंच बोलणार आहेस?

अबक - मी बोलायलाच नको होतं! आणि बोलायचं तरी काय?

उषा - कां? आपले कॉलेजातले दिवस ..... पूर्वीचं सगळं विसरलास.

अबक - विसरावं लागलं!

उषा - माझ्या निर्णयामुळंच ना? मान्य आहे मला ते. पण त्यावेळी आई-बाबांनी मला अशा कात्रीत पकडलं होतं की.... माझे लग्न झाल्यावर वर्ष सहा महिन्यात आई-बाबा गेले. आता त्याबद्दल बोलून काय उपयोग? पण एक खंत मनाला डाचत राहिली आहे. त्यावेळची परिस्थिती समजावून घेण्याचा प्रयत्न केला असतास तर ... पुढले सगळे अनर्थ आपण टाळू शकलो असतो.

अबक - अनर्थ? गरीब प्रियकराच्या तावडीतून सुटका करून घेतलीस हा अनर्थ? लखपती नवरा मिळाला हा अनर्थ? आज एवढ्या मोठ्या बंगल्यात राहतीयस हा अनर्थ? तुझ्या सारखीच सुंदर मुलगी पदरात पडलीय तो ही अनर्थच? तुझ्या वडिलांनी माझ्याकडेच पन्नास हजार रूपये मागितले आणि मी ते देऊ शकलो नाही हा अनर्थ झाला खरा!

उषा - अशोक, तुझ्यात खूप चांगले गुण आहेत. पण एकच मोठा दोष आहे. एकाद्या बद्दल एक ग्रह करून घेतलास की तो बदलायला तू तयार होत नाहीस! त्यावेळी बाबांना हायकोर्टात केस लढण्यासाठी पन्नास हजार हवे होते. कर्ज म्हणून!

अबक - आणि बाळासाहेबांनी ते दिले. शिवाय दोन्हीकडचा खर्च करण्याची तयारी दाखवून तुला मागणी घातली. मग काय. अशी सोन्याहून पिवळी संधी तुझे वडील सोडणार होते थोडेच!

उषा - ठीक आहे. त्या पापाचं परिमार्जन करण्याचं मी ठरवलंय. मी सांगीन ते करशील?

अबक -	अहो मी नाटकवाला आहे मला काम द्या! मी गायक आहे मला गायची संधी द्या अशी पाटी गळ्यात अडकवून चौकाचौकात उभा राहू?

उषा -	काही सांगायला जावं तर टांगायला तयार होतोस! (पडतं खाऊन) मी सांगीन ते करशील? फक्त एकदा! माझ्यासाठी! प्लीज. नाही म्हणून नकोस!

अबक -	ठीक आहे! बोल.

उषा -	बाळासाहेबांची एका नाट्यनिर्मात्याशी ओळख आहे. शिवाय आमच्या फॅक्टरीची जाहिरात दोन चॅनलवर चालू आहे. बाळासाहेबांनी शब्द टाकला तर तुला नक्की काम मिळत राहील.

अबक -	बेबीची शिकवणी देऊन आधीच उपकार केलेत त्यांनी माझ्यावर. परवाच त्यांनी मला सांगितलं की माझी शिकवणी ठेवली त्याच दिवशी माझ्या पायगुणामुळं तुमच्या फॅक्टरीला पांच लाखाची ऑर्डर मिळाली. म्हणजे माझ्या लायकीपेक्षा माझा पायगूण वरचढ ठरला. अशी कामं या पुढं करणार नाही मी! सल्याबद्दल आभारी आहे. येतो मी.

*(अबक जातो.)*

उषा -	या माणसाशी कसं वागावं आणि त्याचं काय करावं तेच कळत नाही. अशोकला 'प्रॅक्टिकल' होणं कधीच जमलं नाही. प्रॅक्टिकल लोकांच्या या जगात म्हणूनच तो वेगळा, उठून दिसतो. म्हणूनच मी त्याच्यावर एकेकाळी प्रेम केलं, अजूनही करत्येय्, पुढंही करत राहणार आहे.

*(जाते. दुसऱ्या बाजूनं अबक प्रवेश करतो.)*

अबक - मंडळी, बेबीची शिकवणी सोडून देणं मला अजून जमलं नाही. खरं कारण सांगू कां? तिथं माझा अहंकार गोंजारला जातो. चांगला शिक्षक, गोड गळ्याचा गायक, चांगल्या पायगुणाचा अशी विशेषणं त्या घरातल्या माणसांशिवाय मला कोण लावणार आहे. शिवाय 'कधी तरी प्रॅक्टिकल विचार कर रे अशोक' असं कळकळीनं सांगणारी माझी एकेकाळची प्रेयसी त्या घरात सुखानं नांदत आहे, माझ्या गुणांचं चीज व्हावं असं तिला अजून वाटतंय् एवढं समाधान मला पुरे आहे. बेबीचा बाप मला दरवर्षी तीन हजार रूपये बोनस देतोय ते वेगळंच! आमची कंपनी सुद्धा एवढा बोनस देत नाही...... बाप रेऽऽ! (घड्याळ बघून) ऑफ़िसला जायला चांगलाच उशीर होणार! आज ऑफ़िसमधे नक्की मुंज-हजामत- होणार!! साडेअकराचा मुहूर्त आहे. जमलं तर या अक्षता टाकायला.

(अबक गडबडीनं बाहेर जातो. विरूद्ध बाजूनं पुरूष पात्र प्रवेश करतं - साहेबाच्या भूमिकेत. दुसऱ्या बाजूनं अबक गडबडीत प्रवेश करतो. अबक आणि साहेब समोरासमोर येतात. दोन-चार वेळा भुवया उडवून एकमेकाला प्रश्न विचारल्यासारखं करतात. साहेब शेवटी घड्याळ दाखवतो.)

अबक - होऽऽ.... म्हणजे नाही.... म्हणजे होऽ पण.

साहेब - आज कोण मेलं? कोण बाळंत झालं?..कुणाला हॉस्पिटलमधे पोहाचवायचं होतं.

अबक - नाही.... म्हणजे त्याचं काय झालं, सऽर, की......

साहेब - मिस्टर अबक, तुम्ही आजपर्यंत पांच आजोबा, चार काका, तीन आत्या आणि दोन मावशांना स्मशानात पोहोचवलं आहे. तुमच्या भावाची बायको, बहिणी आणि तुमची

मिसेस यांची मिळून सतरा बाळंतपणं झाली आहेत. तुमचे चौतीस मित्र हॉस्पिटलमधे खितपत पडले आहेत.

अबक - काहीतरीच काय सर!

साहेब - माझ्याकडं तारीखवार नोंदी आहेत. बघायच्या आहेत?

अबक - चुकलो सर!

साहेब - तुमचं चुकलं नाही. चुकलं आमचंच! तुम्हाला नोकरीवर ठेवून घेतलं हीच चूक झाली. तुम्ही आता असं करा. घरकाम, शिकवण्या, संगीत साधना, बाळंतपणं, मयती, समाज सेवा करत बसा. ऑफ़ीसमधे येऊच नका.

अबक - (घाबरून) म्हणजे..... सर, तुम्ही मला नोकरीवरून काढून टाकणार?

साहेब - नाही! तुमचा पगार मी घरी पोहचवत जाईन. म्हणजे तुम्हाला शिस्त लावू शकलो नाही हे दुःख तरी मला होणार नाही.

अबक - पण सर आज कारण वेगळं होतं. आज आमच्या नव्या नाटकाचा मुहूर्त होता. सक्काळीच! (साहेब ताड्ताड्र निघून जातात.) असे आमचे साहेब! वैतागतात, रागारागानं बोलतात! पण माणूस चांगला आहे. नाटक हा त्यांचा वीक पॉईंट! त्या दिवशी लंच आवर मधे त्यांनी मला बोलावून घेतलं......

साहेब - ये! ये! नाटकं पण करतोस?

अबक - हो सर!

साहेब - आज कोणत्या नाटकाचा मुहूर्त होता.

अबक - गडकऱ्यांच्या ‘एकच प्याला’चा.

साहेब - वाऽ वाऽ वाऽ! अरे गडकरी म्हणजे मराठी नाट्यदेवतेच्या मुकुटातला अनमोल हिरा! तू कोणतं काम करतोयस्?

अबक - सुधाकरचं!

साहेब - वाऽ वाऽ वाऽ! गावाकडं असतांना मी सुद्धा एकदा सुधाकरचं काम केलं होतं! सुधाकरच्या स्वगतातली काही वाक्य मला अजून आठवतायत! ऐक हे ऽ! (अतिशय नाटकीपणे) रामलाल, आता या रिकाम्या पेल्यात तुला काय दिसतंय? काही नाही? अरे नीट पहा म्हणजे श्रीकृष्णाच्या तोंडात, विश्वरूप दर्शन प्रसंगी यशोदेला दिसले नसतील, ते चमत्कार तुला या पेल्यात बघायला सापडतील? काबाड कष्ट उपसून आलेला थकवा घालवण्याच्या आशेनं दारू पिणाऱ्या मजुरांच्या त्या पहा झोपड्या! तो पहा, तो पहा, प्रतिष्ठितपणाचं लक्षण म्हणून चोचल्यानं दारू प्यायला शिकलेल्या पढत मूर्खांचा तांडा ... (दीर्घश्वास घेऊन) दारूबाज नवऱ्यांच्या बायकांची ती पहा पांढरी फट्फटीत कपाळंऽऽ (आवेशानं विंगमधे दिसेनासा होतो.)

अबक - ते वाक्य ऐकता ऐकताच मी पांढरा फटफटीत होऊन एक तास बेशुद्ध पडलो होतो. तर .... असे आमचे नाटकवेडे साहेब. मंडळी, खरं तर नाटकाचं वेड लागल्यापासून माझी संगीताची ओढ कमी झालीय्. अहो, नाटक म्हणजे सर्व कलांचा संगम! म्हणूनच मी त्या कलेकडं जास्त ओढला गेलो. पण काय सांगायचं? ती ओढ प्रत्येकाला सारखी नसते. नदीच्या एका किनाऱ्याकडल्या पाण्याला जास्त आढ असेल तर तो किनारा जसा जास्त धुपला जातो. तसं नाटकाची ओढ ज्याला जास्त, ती व्यक्ती जास्त उध्वस्त होते!

एक किस्सा सांगतो. हौशी नाट्य संस्थांना अजून स्त्री पात्रांची चणचण भासते. स्त्री पात्राच्या शोधात मी हिंडत होतो. सौ. प्रीति कावळे लग्नापूर्वी नाटकात काम करत असत असं कानावर आलं म्हणून मी एका रविवारी कावळ्यांच्या बंगल्यावर जाऊन धडकलो. प्रीतिताईंच्या सासऱ्यांशी व्हरांड्यातच गाठ पडली.

अबक - नमस्कार कावळे साहेब.

सासरा - ते ठीक आहे. पण भेटायला येण्यापूर्वी फोन करून वेळ ठरवण्याची रीतभात तुम्हाला कुणी शिकवलेली दिसत नाही.

अबक - सॉरी सर!

सासरा- ते ठीक आहे. पण काय काम काढलंत ते बोला चटकन्.

अबक - तुमच्या सुनबाई नाटकात काम करतील का ते विचारायला आलो होतो.

सासरा- ते ठीक आहे. पण आमच्या काही अटी आहेत. त्या तुम्हाला मान्य कराव्या लागतील. अट १ ली-नाटक मी आधी वाचून बघीन. तांबड्या शाईनं खुणा केलेला भाग तुम्हाला गाळावा लागेल.

अट २ री- रात्री नऊच्या पुढं सुनबाई तालमीला थांबणार नाहीत.

अट ३ री - आम्ही सांगू तेच कपडे आणि दागिने सुनबाई वापरतील.

अबक - भरजरी कपड्यांची आणि दागिन्यांची गरजच नाही. कारण नाटक सामाजिक आहे.

सासरा - अट मान्य नसेल तर चालू लागा.

अबक - तुमच्या सगळ्या अटी मान्य आहेत मला.

सासरा - थांबा. सगळ्या अटी सांगून झाल्या नाहीत अजून. सगळ्या अटी मान्य असल्याचं पत्र मी तुमच्याकडून घेणार आहे नंतर! तर...अट ४ थी- तालमीच्या काळात आणि प्रयोगाच्या वेळी आमच्या सुनबाई आणि इतर पुरूष पात्रं यांच्यात कमित कमी दीड फुटाचं अंतर ठेवावं लागेल. अट ५ वी-नाटकाचा फोटो आमचा फोटोग्राफर काढेल. अट ६ वी आणि शेवटची- नाटकाच्या प्रयोगाच्या दिवशी माझ्यासाठी विंगमध्ये बसण्याची खास व्यवस्था करावी लागेल.

अबक - सगळ्या अटी मान्य असल्याचं पत्र देऊन मी बाहेर पडलो. पण त्याचा परिणाम असा झाला की तांबड्या शाईनं खुणा केलेला भाग गाळल्यामुळं तीन अंकी नाटकाची एकांकिका झाली, भरजरी शालू आणि दागिन्यांमुळं सामाजिक नाटकाला ऐतिहासिक बाज चढला! प्रयोगाच्या दिवशी कहरच झाला. सासरेबुवा विंगमधे ठिय्या मारून बसले होते. सुनबाई आणि एकादं पुरूष पात्र यांच्या मधलं अंतर दीड-फुटाऐवजी सव्वा फुट झालं की म्हातारा विंगमधूनच ओरडायचा 'दूर...दूर होऽ दूर हो!'

या गोंधळातही फोटोग्राफरनं सौ.कावळ्यांचा एक छान फोटो काढलाच! कावळ्यांच्या बंगल्याच्या दिवाणखान्यात तो फोटो मोठ्या दिमाखात टांगून ठेवलेला तुम्हाला दिसेल. त्या फोटोत मला मात्र एका फाशी दिलेल्या नाटकाची छबी दिसते!

माणसाचे स्वभाव वेगळे असतात, संस्कार वेगळे असतात, प्रत्येकानं स्वीकारलेली जीवन मूल्यं वेगळी असतात. नाटक म्हणजे वेगवेगळ्या जीवनमूल्यातला संघर्ष! संघर्ष आला की मनस्तापही आला. पण तो मनस्ताप जीवनातल्या व्यावहारिक

मनस्तापातून मुक्ती देणारा असतो. मुक्तीचा तो आनंद मिळवण्यासाठीच सगळी धडपड असते. अहोरात्र धडपड!!

रात्री झाली वाटतं! घराची किल्ली आह माझ्या जवळ. बायकोची झोपमोड होऊ नये म्हणून मी किल्ली घेऊनच रोज बाहेर पडतो. पण मला कधीही किल्ली वापरावी लागलेली नाही. जिन्यात पावलं वाजली की ती दार उघडून माझी वाट पहात उभी असते. घरातली सगळी कामं उरकून, मुलांना जेवू घालून अन् त्यांना झोपवून या क्षणाची वाट बघत उभी असते. तो क्षणच काय तो आमचा असतो. अबक आणि मिसेस अबक यांचा!! मला गेलं पाहिजे…

(अबक जातो. सौ.अबक प्रवेश करते. दार उघडल्याचा अभिनय करून उभी राहते. क्षणभरानं अबक प्रवेश करतो. सौ.च्या खांद्यावर हात ठेवतो. हसत हसत दोघं जाऊ लागतात.)

(पडदा पडतो.)

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर “मराठी पुस्तक” किंवा “Marathi ebook” टाकले की पाच कोटी नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके “विनामूल्य” देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत “साहित्यरत्नांच्या खाणी” निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव केला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि

त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने, पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची अकरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची पाच अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक “स्वांतःसुखाय” लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या “साहित्यरत्नांचिया खाणीं” मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनात प्रगती कशी होईल याकडे लक्ष देणारे लेखक आता येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

आमेन

सुनील सामंत

अध्यक्ष

ई साहित्य प्रतिष्ठान